# लैंगिक गुन्ह्यापासून बालकाचे संरक्षण कायदा २०१२

## पोक्सो - pocso

**वैशिष्ट्ये :-**

१) संपूर्ण कायदा व कार्यपद्धती बालकेंद्री आहे.

२) लिंगनिरपेक्ष कायदा,

३) संमतीचे वय १६ ऐवजी १८ वर्षे

४) गुन्ह्याची माहिती पोलिसांना देणे बंधनकारक.

५) गुन्हा झाला नाही असे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर आहे.

**कलम २ व्याख्या:-** बालकाचा अर्थ १८ वर्षाखालील कोणतीही व्यक्ती असा आहे.

**कलम ३:-** लिंगप्रवेशाचा अत्याचार (कलम ४ शिक्षा) ७ वर्ष, अजीवन कारावास.

**कलम ५:-** गंभीर स्वरूपाचा लिंगप्रवेशाचा अत्याचार (शिक्षा कलम ६) १० वर्षे

**कलम ७:-** लैंगिक आघात (कलम ८ शिक्षा ३ते५ वर्षे)

**कलम ९-** गंभीर प्रकारचा लैंगिक आघात( कलम १० शिक्षा ५ ते७ वर्षे)

**कलम ११-** लैंगिक छळ (कलम १२ शिक्षा ३वर्षा पर्यंत, दंड)

**कलम १३ व १४-** अश्लील साहित्य निर्मितीसाठी बालकाचा वापर (कलम १५ शिक्षा ३ वर्षांपर्यंत)

**कलम १६ व १७ -** गुन्हा करण्यास उत्तेजन देणे/मदत करणे.

**कलम १८-** गुन्हा करण्याचा प्रयत्न करणे.

**कलम १९-२०-** गुन्ह्याची नोंद करणे बंधनकारक

**कलम २३ -** माध्यमासाठी गोपनीयतेचे नियम

**कलम २८ ते ३८ :-** विशेष न्यायालयाची तरतूद व बालककेंद्र कार्यपद्धती,

# Cyber Crime

## माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८

सध्याचे युग हे तंत्रज्ञनाचे युग हो. प्रत्येक कार्य तंत्रज्ञानाशिवाय होणे अशक्यप्राय झाले अहे. प्रत्येक क्षेत्रात आधुनिकीकरण आले आहे. इंटरनेटचा वापर आज घराघरात होताना दिसतो. प्रत्येकाच्या हातात मोबाईल सारखे यंत्र असून इंटरनेटचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र सोशल मिडीया वापरताना अनेक बाबींची काळजी घ्यावी लागते.

## सोशल मिडिया वापरतांना घ्यावयाची काळजी

१) कुठलाही सोशल App डाऊनलोड करण्याआधी किंवा सोशल मिडियावर सभासद होण्याआधी Terms and conditions अवश्य वाचावे. आपण वापरत असलेली माहिती सदरच्या Apps ला किती वापरू देणार आहात, हे आपल्याला समजेल.

२) ऑनलाईन मैत्री करताना, चॅटींग करताना समोरच्या व्यक्तिचा प्रोफाईल तपासून घ्या. बनावट प्रोफाईल बनवून ऑनलाइन मैत्री करून फसवणुकीचे प्रकार उघडकीस आले आहेत.

३) पासवर्ड बद्दल विशेष काळजी घ्या. आपला पासवर्ड कोणाशीही शेअर करू नका, पासवर्ड ठराविक काळाने बदलणे अतिउत्तम. तो कठीण असू द्या.

४) ऑनलाईन मैत्री झालेल्या मित्रांना एकांतात भेटणे टाळावे.

५)सोशल नेटवर्कींग साईटवर आवश्यक तेवढीच माहिती टाका.

६) फोटो अपलोड करताना कमीत कमी Resolution चा टाका. (किमान 72ppi)

७) सोशल नेटवर्कींग साइट्वर प्रायव्हसी सेटींग्ज पर्याय उपलब्ध असतात, त्यांची बारकाईने माहिती घ्या, त्यांचा वापर करा.

**पालकांनी घ्यावयाची काळजी :-** इंटरनेटच्या मोहामयीपणा सर्व वयोगटाला भुरळ घालत आहे. आपले मुल जर नेट चा वापर करत असेल तर पालकांनी स्वत: जागरूक होणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या मुलांशी संवाद साधून नेटवर्कींग बाबत त्याच्यासोबत चर्चा करा. १२ वर्षाखालील मुले नेट वापरत असतील तर स्वत: लक्ष ठेवा. मोबाईल देणे कटाक्षाने टाळावे. मुलांना नेट, सोशल मिडीया वापरावयाचे नियम, वेळेचे नियोजन तयार करुन ते पाळले जातील याची काळजी पालकांनी घेणे आवश्यक आहे.

## सायबर क्राईम



माहिती तंत्रज्ञान (सुधारीत) कायदा दिनांक २७/१०/२००९ पासून भारतात लागू झाला आहे. ११ प्रकारच्या गुन्ह्यांसाठी कलम ६५ ते ७८ चा समावेश आहे.

**कलम ६७ :** अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरुपात प्रसिद्ध करणे.

**कलम ६७ (ए)** लैंगिक शोषणाबाबतचे साहित्य प्रसिद्ध करणे. लैंगिक शोषणाबाबतचे साहित्य प्रसिद्ध करणे. या गुन्ह्यासाठी पाच वर्षांचा कारावास व दहा लाखापर्यंत दंड या प्रकारच्या गुन्ह्यात प्रामुख्याने शाळा, कॉलेजमधील मुलामुलींचे लैंगिक कृत्याबाबत व्हिडीओ क्लिप्स (एम.एम.एस.) इंटरनेट वरुन किंवा मोबाईलवरुन प्रसिद्ध, प्रसारित केल्या जातात. (दिल्ली पब्लिक स्कूल : एम.एम.एस. ही प्रसिद्ध केस आहे.)

**कलम ६७ (बी)** लहान मुलांचे लैंगिक शोषणाबाबतचे साहित्य प्रसिद्ध करणे. या गुन्ह्याबद्दल ५ वर्षांचा कारावास व दहा लाखांपर्यंत दंड.

**कलम ६७ (सी)** मध्यस्थानी माहिती सुरक्षित ठेवणे व काढून देणे यासाठी ३ वर्षांचा कारावास व दंड होवू शकतो.